## चिपळूण येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

रे दि मु नं. ६८/२०१८

<u>निशाणी २५ खालील आदेश</u>

( श्री.कृष्णा रामा माळी व इतर २ विरुध्द श्रीमती कृष्णीबाई धोंडू माळी व इतर २३ )

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केलेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये अदयापही काही प्रतिवादी हजर झालेले नाहीत. सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्रमांक १ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

२. वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या विधिज्ञांचा सदर अर्जावर युक्तिवाद ऐकला.

३. सदरच्या अर्जामध्ये वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन अनावधानाने चुकीचे नमूद केलेले आहे. सदरच्या मिळकतीबाबत वादी यांची मागणी असल्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज केला आहे.

४. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. सदर दाव्यातील विनंती पाहता जर सदरचा अर्ज मंजूर केला तर दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याकामी वादीतर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अदयापही दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये सदरचा दुरुस्ती अर्ज हा मुदतीत आहे. वादी व प्रतिवादी यांच्यातील मूळ वादाचे निराकारण करण्यासाठी सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये वरील बाबींचा विचार करता, मी खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

अ. वादीचा निशाणी २५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

ब. वादीने निशाणी २५ मध्ये मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती दाव्यामध्ये सदर अर्जाच्या आदेश तारखेपासून १५ दिवसांच्या आत करण्याची आहे.

क. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

दिनांक - २८/०९/२०१८ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चिपळूण.

## Certificate

| | |
|---|---|
| Case No. | : R.C.S.No. 68 of 2018. |

I affirm that the contents of this PDF file are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : S.M.Jadhav |
| Court name | : Jt. Civil Judge (J.D.) Chiplun. |
| Date of decision. | : 28-09-2018 |
| Order signed on | : 28-09-2018 |
| Order uploaded on | : 28-09-2018 |